दै. प्रजावाणी दि. 08/10/2023

# गावठी पिस्टल विक्रीसाठी आणणाऱ्या तरुणास वजिराबाद पोलिसांकडून अटक



नांदेड, दि. ७ : पोलिसांना पाहताच पळून जाणाऱ्या एका युवकास पाठलाग करुन पकडल्यानंतर त्याची झाडाझडती घेतली असता त्या युवकाकडे गावठी बनावटीची पिस्टल आढळून आली. वजिराबाद पोलिसांनी आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

वजिराबाद पोलीस स्थानकाचे एक पथक बसस्थानक परिसरात गुन्हेगारांचा शोध घेत होते. यावेळी बसस्थानक पुलाच्या खाली रेकॉर्डवरील गुन्हेगार महम्मद नदीम म. नाजीम (रा. मगदुमनगर, नईआबादी) हा पोलिसांना पाहताच पळून जाऊ लागला. त्याचा पाठलाग करुन पकडले असता त्याच्या कमरेला गावठी पिस्टल लावल्याचे पोलिसांनी केलेल्या झडतीत आढळून आले. त्या पिस्टलची किंमत २० हजार रुपये एवढी असून विक्री करण्यासाठी आणल्याची कबुली नदीम याने पोलिसांकडे केली. या प्रकरणी पो. नी. विजयकुमार नंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी नदीम विरुद्ध भारतीय हत्यार कायद्यान्वये वजिराबाद पोलीस स्थानकात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीला तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळाल्याने त्याने आत्तापर्यंत किती गावठी पिस्टल विक्री केल्या आहेत हे पोलीस तपासात समोर येणार आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, पो. अ. अ. अबिनाश कुमार, अुपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली व पो. नि. अशोक घोरबांड यांच्या सूचनेवरुन वजिराबाद 'डीबी'चे सपोनि शिवराज जमदाडे, कर्मचारी विजयकुमार नंदे, शरदचंद्र चावडे, शे. इम्रान शे. एजाज, बालाजी कदम, रमेश सूर्यवंशी आदींनी केली.

दै. लोकमत दि. 08/10/2023

# पिस्टल विक्रीसाठी आला अन् पोलिसांच्या तावडीत सापडला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शहरात गेल्या काही दिवसांत पोलिसांनी पिस्टल विक्री करणाऱ्या टोळीला पकडले आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पिस्टल आणि जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. शुक्रवारी सायंकाळी बसस्थानक ओव्हरब्रिजच्या खाली अशाचप्रकारे एक जण पिस्टल विक्रीसाठी आला असताना वजिराबाद पोलिसांनी त्याला पकडले. त्याच्याकडून पिस्टलही जप्त केली आहे.



महंमद नदीम महंमद नाजीम (रा. नवी आबादी) असे आरोपीचे नाव आहे. शुक्रवारी सायंकाळी तो पिस्टल विक्रीसाठी बसस्थानक ओव्हरब्रिजच्या खाली आला होता.

याबाबत वजिराबाद ठाण्याचे पोलिस निरिक्षक अशोक घोरबांड यांना खबऱ्याकडून माहिती मिळाली होती. त्यानंतर गुन्हे शोध पथकाला बसस्थानक परिसरात पाठविण्यात आले. पोलिसांना पाहताच आरोपी पळून जात होता. पोलिसांनी पाठलाग करुन त्याला पकडले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे एक गावठी पिस्टल आढळून आले. पोलिसांनी या प्रकरणात वजिराबाद पोलिस ठाण्यात महंमद नदीम महंमद नाजीम याच्या विरोधात गुन्हा नोंद केला आहे.